कामगार आयुक्त यांचे अधिपत्याखालील अधिकारी/ कर्मचारी यांचेवर विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचेही कामकाजाबाबत नियंत्रण प्रस्थापित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. रास्वावि-२०१०/प्र.क्र.११/कामगार-८
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
दिनांक :२९.५.२०१०

**वाचा:** १) विकास आयुक्त यांचे पत्र क्र.वि.आ.(अ.का)पदनिर्मिती/२०१०/कार्या-१/ दि.२०६.२.२०१०
२)शासन निर्णय क्र.काआआ-१७०४/प्र.क्र.८६०/कामगार-८,दि.१५ जुलै २००४

**प्रस्तावना :-**

विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचे माध्यमातून असंघटीत कामगारांसाठी राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना, जनश्री विमा योजना व असंघटीत कामगारांच्या विविध योजना विविध असंघटीत कामगार मंडळामार्फत राबविण्यात येत असून भविष्यातही राबविण्यात येणार आहेत. राज्यातील एकूण कामगार संख्येच्या ९३% (सुमारे ४ कोटी) कामगार असंघटीत क्षेत्रात आहेत. तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ ची अंमलबजावणी करणे शासनावर बंधनकारक आहे. निधी जमा करण्यात येतो. त्या निधीतून योजना राबवायच्या आहेत तसेच घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम २००८ पारीत झाला असून त्याचीही अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. तसेच असंघटीत कामगारांसाठी इतरही अधिनियम लागू करण्यात येणार असून त्याचीही अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

राज्यातील ९३ % कामगारांना न्याय व त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठीचे विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचे काम अतिशय व्यापक आहे. शासन निर्णय दि.१५ जुलै २००४ अन्वये विकास आयुक्त (असंघटीत कामगार) कार्यालयासाठी ८ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यात तीन राजपत्रीत अधिकारी व पाच अन्य कर्मचारी इतकी पदे मंजूर आहेत. ही आठ पदे या चार कोटी असंघटीत कामगारांना न्याय व हक्क



Scanned by CamScanner

मिळवून देण्यासाठी अपुरी आहेत. तसेच या पदांसह राज्यातील चार कोटी असंघटीत कामगाराचे हित, सुरक्षितता व हक्क याबाबत प्रभावीपणे व परीणामकारक काम करणे कठीण आहे. असंघटीत क्षेत्रातील कामगार सध्या दुर्लक्षित आहेत. व त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन कटीबध्द आहे. या बाबी लक्षात घेता असंघटीत कामगार या दुर्बल घटकासाठीच्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सर्व पदांच्या अधिकार व कर्तव्यामध्ये विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांच्या आस्थापनावरील सर्व समकक्ष पदांची अधिकार व कर्तव्ये समाविष्ट करणे आणि त्यानुषंगाने कामगार आयुक्त यांचे अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेवर विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचेही कामकाजाची अमंलबजावणी करणे व त्याबाबत नियंत्रण प्रस्थापित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णयः-

विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांना कामगार आयुक्त यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे दैनंदिन कामकाजाची अमंलबजावणी करणे व त्याबाबत नियंत्रण ठेवण्यासाठी शासनअधिकार प्रदान करीत आहे. तसेच कामगार आयुक्त यांचे अधिकारी/कर्मचारी यांचे नेहमीचे अधिकार व कर्तव्यामध्ये वृध्दी करुन त्यांना पुढिल प्रमाणेही अधिकार व कर्तव्य सोपविण्यात येत आहेत.

१. इमारत व इतर बांधकाम कामगार ( रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम १९९६ या कायद्याची अंमलबजावणी करणे.

२. घरेलू कामगार कल्याण मंडळअधिनियम २००८ ची अंमलबजावणी करणे

३. बालकामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६ ची अंमलबजावणी करणे

४. असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा कल्याण अधिनियम,२००८ या केंद्र शासनाच्या अधिनियमाची राज्यात अंमलबजावणी करणे.

G:Dual Control.lwp
एच-१०८५ -१३

Scanned by CamScanner

५. अस्तित्वातील कामगार कायदे जसे किमान वेतन अधिनियम १९४८, उपदान अधिनियम १९७२, किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८३, बोनस अधिनियम १९६५, कंत्राटी कामगार (नियमन व निमूर्लन) अधिनियम १९७० तसेच अन्य विद्यमान कायदे जे असंघटीत कामगारांना लागू होतात अशा सर्व कायदयाची अंमलबजावणी या असंघटीत क्षेत्रातील कामगारांसाठी करणे.

६. राष्ट्रीय स्वास्थ विमा योजना, जनश्री विमा योजना या व अशाप्रकारच्या इतरही योजना असंघटीत कामगारांसाठी राबविणे.

७. लेबर मॅनजमेंट यंत्रणे अंतर्गत असंघटीत कामगारांसाठी विविध नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यवाही करणे तसेच असंघटीत कामगारांची नोंदणी करणे व आवश्यक ठिकाणी असंघटित कामगारांच्या मालकांचीही नोंदणी करणे. त्यांच्याकडून असंघटित कामगारांकरीता (घरेलू कामगार व शेतमजुर वगळून) राष्ट्रिय बँकेमध्ये खाते उघडून कामगारांना धनादेशाद्वारे किंवा बँकेद्वारे वेतन व आर्थिक लाभ देण्याविषयी कार्यवाही करणे आणि तसेच मालकांनाही बँकेत खाते उघडण्यासाठी लागणारी मदत करणे इत्यादी अन्य संबंधित कामे ही करणे.

८. असंघटीत कामगारांसाठी भविष्यात निर्गमित होणारे अधिनियम व नियम यांची अमंलबजावणी करणे.

९. कामगार आयुक्तांकडून असंघटीत कामगारांसाठीचे आणखी इतर कोणतेही काम तसेच विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांनी दिलेले इतर कोणतेही काम करणे.

विकास आयुक्त कार्यालयासाठी स्वतंत्र पदे निर्माण होतील किंवा असंघटीत कामगारांसंदर्भातील कायदयांची अमंलबजावणी करण्यासाठी पर्यायी व्यवस्था होई पर्यंत वरील प्रमाणे कामगार आयुक्त यांच्या अधिपत्याखालील अधिकारी /कर्मचारी याचेंवर विकास आयुक्त (असघंटीत कामगार) यांचेही कामकाजाबाबत नियंत्रण राहील तसेच विकास आयुक्त (असघंटीत कामगार) यांचे सर्व काम करणे कामगार आयुक्त यांचे आस्थापनेवरील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेवर बंधनकारक राहील. तसेच असंघटीत कामगारांबाबत कामाच्या/ योजनांच्या अमंलबजावणीबाबतचे अभिप्राय विकास आयुक्त



Scanned by CamScanner

(असघंटीत कामगार) हे सबंधीत अधिका-यांच्या विहीत विवरण पत्रात लिहीतील आणि त्याचा विचार आयुक्त कामगार यांनी संबंधितांच्या गोपनीय अहवालात लिहीताना आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कविता गुप्ता)
सचिव (कामगार)

**प्रति,**

मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
मा.राज्य मंत्री (कामगार)यांचे खाजगी सचिव
विकास आयुक्त (असंघटीत कामगार), कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई
कामगार आयुक्त, कॉमर्स सेंटर, ताडदेव मुंबई
कामगार आयुक्त यांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचारी
विकास आयुक्त (असंघटीत कामगार)मुंबई यांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी व कर्मचारी
सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती कामगार-८ दि.२९.५.२०१०

----------

G:Dual Control.lwp
इच-१०८५ -२अ.

Scanned by CamScanner